नमस्कार मि नीळकंठ सुभेदार ...नाही नाही म्हणजे नाव आणी शरीरयष्टी याचा काहीही संबंध नाही पण पुर्वजी परंपरा आणी चालीरिती यांप्रमाणे ही नावही आमच्यापर्यंत चालत आलीत ,बाकी फारस याच्यात नवल नाही.

असो ...खुप दुरून आलोय ..तेवढी राज्यांची भेट घालून दिली असती तर बर झाल असत. हो मी वाट बघतो ,तेवढा राज्यांना सागावा पाठवा.

हो चला....

मुजरा सरकार ..मुजरा....(आनंदित होऊन ) सोनियाचा दिस आज अम्रुते पाहिला..धन्य झालो राजे ...धन्य झालो ..तुम्हाला पाहील राजे माझा देव मला भेटला.

आजपर्यत ईतिहासकार,कवि, कीर्तनकारांनी जे वर्णन केल , आमच्यावर संस्कार करताना जे आमच्या मनात रुजवलं गेल अगदी तसच किंबहूना त्याहून सुंदर माझ्या राज्याचं हे रूप पाहुन खरच धन्य झालो.

राजे मि कोणी मोठा माणूस नाही ,आपणच घडवलेल्या स्वराज्यातील, याच मातीत जन्माला आलेला एक सामान्य माणूस आहे.

हो आज याच सामान्य माणसाला आपल्या दरबारी याव लागल, नाही म्हंटल बघाव माझ्या राजांचा दरबार कसा होता ते, बघाव माझ्या राजाचं स्वराज्य कसं होतं ते, बघावं माझ्या राजांच्या अवतीभवती असणारी माणसं कशी होते ते, आणि बघावं सामान्य जनतेवर, रयतेवर माझ्या राजाचं किती प्रेम होतं ते.

आजवर फक्त इतिहासात वाचलं, ऐकलंय , जे जे आमच्या पर्यंत पोहोचवलं गेलं तेच आम्हाला समजलं. पण आज प्रत्यक्षात पाहिलं, राजे माझ्या डोळ्यांच पारडं फिटल राजे, माझ्या डोळ्यांच पारड फिटलं.

पण राजे काही वर्षपूर्वी आपण सामान्य माणूस घडवला, ज्या सामान्य माणसाला समाज्यात मानाने वावरायला शिकवलं, तोच सामान्य माणूस आज कुठेतरी मागे पडत चाललाय हो. आज

सामान्य माणूस कुठेही कमी नाही, तो प्रयत्न करतोय पण काही विकृत विचरांची मानस त्याला तिथपर्यंत पोहोचू देत नाहीत.

तुम्ही अबजल खान संपवला स्वराज्यातील आया बहिणीची अब्रू वाचवली , पण राजे आज माझ्या आया बहिणी सुरक्षित नाही हो, दिवसा ढवळ्या त्यांच्या अब्रूवर हात टाकला जातोय, त्यांची विटंबना के केली जातेय, आणि आंमच्यासारखे षंढ प्रवृत्ती ची मानस ते उघड्या डोळ्यानी पाहतायत. कुणा एकाची हिम्मत नाही की त्यांना जाऊन विचाराव की त्यांच्याशी दोन करावे.

राजे तुम्ही राजकारण केलं पण ते प्रजेच्या हितासाठी, पण आज आम्ही राजकारणामध्ये सुद्धा स्वतःचा स्वार्थ बघतोय, मग तिथे कुणाचे नुकसान होवो की अन्य काही आम्हाला त्याचं काही घेणं देणं नाही.

आज आमची बुद्धी भ्रष्ट झाली आहे, दुसऱ्याच्या आनंदापेक्षा आज स्वतःचा आनंद आम्हाला जास्त प्रिय आहे. आम्ही मराठी माणसाला मदतीचा हात तर देत नाहीच, पण जर का स्वप्रयत्नाने कष्ट करून कोणी पुढे गेला तर त्याचे पाय मात्र ओढायला आम्ही सज्ज आहोत..

तुम्ही म्हणायचे की जर का तुम्हाला तुमच्या ध्येयापर्यंत पोहोचायचे असेल तर मराठी माणसाने एकजूट होणं गरजेचं आहे, होतो ना मी एकत्र, काढतो संघटना, काढतो मिरवणूका पण कशासाठी दगडफेक आणि जाळफोळ करण्यासाठी?

स्वकीयांशी वैर करून परकीयांची घर भरण्यातच आम्ही वाया जाणार , आम्हाला आमचे विचारच नाहीत, ते करून सुद्धा काय करणार म्हणा. आमच्या विचारांना चालना देणारे कोणी नाही , पण दबाव आणणारे मात्र कित्येक मिळतील.

न जानो कित्येक कर आणि वसूली माझा सामान्य माणूस भरतोय , राजे एकवेळ पोटाला चिमटा काढतोय पण कर भरतोय, तुमच्या रयतेतील शेतकरी कसा होता हो , तोही कर भरायचा पण सुखी समाधानी आयुष्य जगायचा, पण माझा शेतकरी बांधव कष्ट तेवढेच करतोय आणि व्यवसायिक आणि दलाल यांच्या कचाट्यात सापडलाय. दर साल कित्येक माझा शेतकरी बांधव स्वतःच जीवन संपवतोय, प्रत्येकांची बायका पोर वर्षानुवर्ष या कर्जाच्या बोजाखाली

जीवन जगतायत.. कुठे तरी बदलल पाहिजे राजे.... " ही मानसिकता आणि हे वास्तव कुठेतरी बदलल पाहजे.

त्या.. त्या औरंगजेबाला केवढा विश्वास ओ , की त्यांच्या आया बहिणी मराठ्यांच्या ताब्यात आहेत पण कणभर ना दुख ,ना चिंता , ना भीती . उलट तो स्वतच्या दरबारात मोठ्या तोरयात सांगतोय की " फक्त मराठ्यांच्याच ताब्यात आहेत ना, मग चिंता सोडा . औरतों के लिए मराठों के सिवा दुसरी सुरक्षित जगह नही है " राजे ही तुमची पुण्याई राजे, तुमच्यावर झालेल्या संस्काराची पुण्याई.

राजे आज आम्ही तुमची जयंती पुण्यतिथी न चुकता साजरी करतो हो , छत्रपती शिवाजी महाराज की हे शब्द कानावर पडतात कोणाच्याही मुखातून आपसूक जय बाहेर पडत. ही आपण केलेली पुण्याई आहे. आपण दिलेले आचार विचार, आजही आम्ही कटाक्षाने पाळतो, त्याचा सन्मान करतो.

पण कुठेतरी वाटतं की या विचारांना थोडी धार देण्याची गरज आहे, एखाद्या तलवारीच्या लखलखत्या पात्याप्रमाणे हे विचार चमकले पाहिजेत, आणि समोर येणाऱ्या विकृत परिस्थितीवर मात करत विजयाची भगवी पताका या देशाच्या कानाकोपऱ्यात फडकली पाहिजे , तेव्हाच आपण केलेल्या पराक्रमाचे सार्थक होईल.

तुम्ही नाही कधी धर्म,जात यांच्यात भेदभाव केला. आपल्यासाठी , दलित ही तेवढाच , मध्यमवर्गीय ही तेवढाच, आणि उच्चवर्णीय तेव्हाच महत्त्वाचा होता, पण आमच्यातही मानसिकता कधी येणार , आमच्यात हा शिव विचार कधी जागणार.

महाराज ही सगळ जर का सुरळीत करायच असेल तर गरज आहे.. .. .. गरज आहे आम्हाला तुमच्या सारख्या राज्याची ,गरज आहे आम्हाला तुमच्या सारख्या नेतृत्वाची, गरज आहे आम्हाला या भागव्या झेंड्याची , गरज आहे आम्हाला या मर्द मराठी मावळ्यांची,गरज आहे आम्हाला आपल्या शिव विचारांची , आणि गरज आहे राजे आम्हा रायतेला न्याय देणाऱ्या स्वराज्याची, गरज आहे राजे गरज आहे ..

आणि ही सर्व स्वप्नवत जग जर का सत्य करायच असेल तर एकच मार्ग आहे राजे आपण पुनः जन्माला या ,राजे पुनः जन्माला या ,राजे पुनः जन्माला या.